**"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"**
**या बाबीची दर निश्चितीबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक.उसं/भांखस/फाईल पॅड व फाईल कव्हर्स/दरनिश्चिती/२०२१-२२/(१२)/२०२१** प्रि ७५७३

**दिनांक:-** 18 AUG 2021

**वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.०३/०८/२०२१ रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** या बाबीची **सन २०२१-२२** या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी **मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, औरंगाबाद** या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.०३/०८/२०२१ रोजीच्या बैठकीत **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** या बाबीची सन २०२०-२१ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** बाबीचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | वस्तूंचे नाव | विनिदेश | दर प्रत्येकी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | फाईल पॅड / (केस बोर्ड) | **Case Board** (Item No. d.215) Size 24 cms, & 36 cms.<br>(to be manufactured from specification)<br>a) 91 DKG straw Board of 1887 GSM and size 61x86 cms. as per Grade A.<br>b) Strong while ape having a length of 98.5 cm and width of 1.25 cm. It should have a good selage. It should have a wrap of 2/20 and wett. of 2/10 with 48 ends 22 picks per 25.4 cm.<br>c) Superior binding cloth in the size 61 x 10 cm. It should be suitably strengthened by pecting catridge paper on the rough side. It should have 60 ends and 48 Picks per 2.54 mm. and should have a weight of 0.23 Kg. Per sq. Meter.<br>d) While catridge in the size 61 x 10 cms. 100 GSM.<br>e) Paper in the size 35.5 x 23.5 cms. 10 GSM | १४.०० |
| २ | फाईल कव्हर | **File Covers as per (Sectt.)**<br>24 BM Board duly printed with clothing (4"X14") inside and outside cloth duly punched leaving a distance of 3" between two punched holes these hiles should be in the entry of the Board. २४x ३६ सें.मी. (बाब क्र.२४ बीएम) २८० जीएसएम आणि किमान चिंधीचे प्रमाण ५० टक्के | १०.०० |

सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता **दि.३०/०४/२०२२** पर्यंत राहील. फाईल पॅड व फाईल कव्हर्स या बाबीसाठी जर वस्तू व सेवा कर (GST) लागू असेल, तर बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

संस्थेनी स्वत: उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये. संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०६ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

वरील संस्थेने शासकीय कार्यालयात फाईल पॅड व फाईल कव्हर्स यांचा पुरवठा केल्याबाबतचा अहवाल वस्तूनिहाय प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद -४३१ ००१.

२) निवड नस्ती.